# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 September 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ सप्टेंबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- वक्फ सुधारणा कायद्याला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार;कायद्यातील काही तरतुदींना मात्र स्थगिती
- राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस-बीड जिल्ह्यात पूरग्रस्तांसाठी सैन्यदलाकडून बचावकार्य
- शेतकऱ्यांना महिनाभरात कर्जमाफी द्यावी अन्यथा राज्यभर आंदोलन-ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा इशारा

आणि

- बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी बीड तसंच जालन्यात मोर्चा

****

सर्वोच्च न्यायालयानं वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला पूर्णपणे स्थगिती द्यायला नकार दिला असून या कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या पीठानं हा निर्णय दिला. आपली संपत्ती वक्फला समर्पित करण्यापूर्वी देणगीदार किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचा अनुयायी असावा ही तरतूद न्यायालयानं स्थगित केली. वक्फ मालमत्तेचं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण झालं की नाही हे ठरवण्याचा अधिकार, शासनानं नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना बहाल करण्यालाही सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसंच वक्फ मंडळावर मुस्लिमेतर व्यक्तीची नेमणूक करण्याची तरतूदही, यासंदर्भात राज्य सरकारांनी ठोस नियम करेपर्यंत स्थगित राहील असं न्यायालयानं स्पष्ट केलं. आज दिलेला हा निर्णय प्रथमदर्शनी

निरीक्षणांवर आधारित असून, खटल्याची सविस्तर सुनावणी नंतर होणार असल्याचं, न्यायालयानं नमूद केलं आहे.

****

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी स्वागत केलं आहे. मुंबईत माध्यमांशी बोलताना रिजीजू यांनी, या कायद्याचा लाभ सर्व मुस्लीम समुदायाला होईल, असा विश्वास व्यक्त केला. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा या कायद्यामागच्या दृष्टिकोनाचा विजय असल्याचं मत रिजिजू यांनी नोंदवलं, ते म्हणाले –

**बाईट – किरेन रिजीजू, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री**

दरम्यान, मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात भाषिक वारसा आणि सांस्कृतिक अभ्यास केंद्राचं भूमिपूजन आज रिजिजू यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध संस्थांमधल्या शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला.

****

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवा पर्वानिमित्त विशेष मालिकेच्या आजच्या भागात नमामी गंगे कार्यक्रमाबाबत जाणून घेऊ.

***गंगा ही आपल्या देशाची जीवनवाहिनी आहे – पवित्र, शाश्वत आणि भारताच्या अर्थव्यवस्थेची एक महत्त्वाची धमनी जणू. जून २०१४ मध्ये नरेंद्र मोदी सरकारने सुरू केलेला नमामी गंगे कार्यक्रम हा गंगा नदीच्या पुनरुत्थानासाठीचा महत्त्वाकांक्षी आणि समग्र उपक्रम आहे. पंतप्रधान मोदींनी गंगेची स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी आहे यावर भर दिला आहे...***

***हम सभी के लिये ये गौरव की बात है, की भारत की इस पहल को आज दुनियाभर से सराहना मिल रही है। युनायटेड नेशन्स ने नमामि गंगे मिशन को इको सिस्टीम को रिस्टोअर करनेवाली दुनिया के टॉप टेन***

*इनिशिएटीव्हज मे शामील किया। ये और भी खुशी की बात है की पुरे विश्व में 160 ऐसे इनिशिएटीव्हज मे नमामि गंगे को यह सम्मान मिला। साथीयों नमामि गंगे अभियान की सबसे बडी ऊर्जा लोगों की निरंतर सहभागीता है।*

*नमामी गंगे हा प्रदूषण कमी करणं तसंच पर्यावरण रक्षण करण्याविषयीचा सामुदायिक सहभाग अधोरेखित करणारा एक बहुआयामी दृष्टिकोन आहे. त्यामुळे नदीच्या पर्यावरणीय सलगतेवर आणि तिच्यावर अवलंबून असलेल्या लाखो लोकांच्या उपजीविकेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.*
*नमामी गंगे कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रदूषण कमी करण्याच्या बाबतीत लक्षणीय प्रगती केली आहे. सांडपाणी प्रक्रिया क्षमता २०१४ पूर्वीच्या क्षमतेपेक्षा ३० पटीनं वाढली आहे. गंगेच्या पाण्यात डॉल्फिनच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे या नदीतल्या परिसंस्थेत सुधारणा झाल्याचं सिद्ध होतं.*
*एकेकाळी अशक्यप्राय वाटणारी कामगिरी नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीत रूपांतरित झाली आहे.*

****

राज्याच्या अनेक भागात आज जोरदार पाऊस सुरू आहे. रायगड जिल्ह्यासह पुणे जिल्ह्याच्या घाट परिसराला आज पावसाचा रेड अलर्ट तर छत्रपती संभाजीनगर, बीड, अहिल्यानगर आणि मुंबईसह कोकणातल्या अन्य जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. उर्वरित राज्यात आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.
बीड जिल्ह्यात अनेक नद्यांना पूर आला असून, लहान – मोठे सर्वच प्रकल्प भरून वाहत आहेत. आष्टी तालुक्यातील कडा, सुलेमान देवळा, पिंपरखेड, धानोरा, शिरापुर, टाकळी अमिया आणि डोंगरगण या गावांचा संपर्क तुटला आहे, तर सात गावांत पुरात अडकलेल्या ५१ नागरिकांच्या सुटकेसाठी सैन्यदलाच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं बचाव कार्य सुरू आहे. आमदार सुरेश धस यांनी याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. आमदार धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे.

दरम्यान, या पावसामुळे शेतकऱ्यांचं आणि इतर मालमत्तांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

जिल्ह्यातलं माजलगाव धरण ९४ टक्के भरलं असून, धरणाच्या दहा दरवाजातून सध्या ५६ हजार ४०३ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

मांजरा धरणाच्या सहा दरवाजातून १८ हजार ७४५ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे. नांदेडच्या विष्णुपुरी प्रकल्पाचा आणखी एक दरवाजा आज उघडण्यात आला. आता धरणातून एक लाख पाच हजार २७१ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातही पैठण, सिल्लोड तसंच वैजापूर तालुक्यात जोरदार पाऊस झाला. सिल्लोड तालुक्यात पुराच्या पाण्यात अडकलेल्या पाच जणांची अग्निशामक दलाच्या पथकाने सुटका केली.

दरम्यान, पैठणच्या जायकवाडी धरणातल्या अठरा दरवाजातून २८ हजार २९६ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं विसर्ग सुरु करण्यात आला आहे.

येलदरी धरणातून सुमारे सात हजार, इसापूर धरणातून सुमारे साडे आठ हजार तर निम्न तेरणा धरणातून सुमारे साडे चार हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात पाथर्डी आणि शेवगाव महामार्गावरील नद्यांना पूर आला आहे. करंजी, मढीसह अनेक गावांचा संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, बारामती-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग तसेच पाथर्डी-बीड राज्य महामार्गावरील पुलांवरून पाणी वाहत असल्याने हे मार्ग बंद करण्यात आले आहेत.

****

राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा घेतला. अतिवृष्टीग्रस्त भागातील जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधत, त्यांनी मदत आणि बचावकार्याबाबत माहिती घेतली आणि सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

****

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. मुंबईत राजभवनात झालेल्या सोहळ्यात मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली.

****

केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर- जीएसटीच्या दरात सुधारणा करून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिल्याचं, आमदार नारायण कुचे यांनी म्हटलं आहे. भारतीय जनता पार्टीच्या जालना जिल्हा कार्यालयात ते आज पत्रकार परिषदेत बोलत होते. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महागाईत घट होईल आणि बाजारातील मागणी वाढेल असा विश्वासही कुचे यांनी व्यक्त केला.

****

शेतकऱ्यांना महिनाभरात कर्जमाफी द्यावी, अन्यथा राज्यभर मोर्चा काढण्याचा इशारा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिला. नाशिक इथं आज शरद पवार यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी कर्जमाफीसह अन्य मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी पवार बोलत होते. जिल्हाभरातले शेतकरी मोठ्या संख्येनं या मोर्चात सहभागी झाले.

****

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी आज बीड इथं बंजारा समाजाच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला. शहरातल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथून सुरूवात झालेल्या मोर्चाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर समारोप झाला.

जालना शहरातही या मागणीसाठी बंजारा समाजाच्यावतीनं मोर्चा काढण्यात आला. शहरातल्या मंमादेवी चौकातून निघालेल्या या मोर्चानं जिल्हाधिकारी कार्यालयावर जाऊन उपविभागीय अधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचं निवेदन सादर केलं. पारंपारिक वेशभुषेत बंजारा बांधव या मोर्चात सहभागी झाले होते.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यातील भाटेगावातून जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाच्या मोजणीला विरोध केला. शेतकऱ्यांनी यावेळी मोजणी थांबवण्यासाठी रस्त्यावर झोपत आंदोलन केलं. यावेळी आखाडा बाळापूर पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना ताब्यात घेतलं.

****

परभणी जिल्ह्यात 'स्वच्छता ही सेवा' अभियान १७ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील सर्व नागरिक, शैक्षणिक संस्था, महिला बचत गट तसंच विविध विभागांनी सहभागी होण्याचं आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक नतिशा माथूर यांनी केलं आहे.

****